
क्र. १६४ पहिले वर्ष

२४ सप्टेंबर २०२३

# रविवारची  उपासना

## सामान्यकाळातील पंचविसावा रविवार

### प्रस्तावना

परमेश्वर न्यावी व करूणशमय आहे. तो आपणा सर्वांवर प्रेम करतो. आपल्या सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन आपणांस मदत करतो. देवासाठी जगणे म्हणजे आपल्या सर्वस्वाचा त्याग करणे व इतरांवर अन्याय न करता त्यांना ख्रिस्ताच्या शिकवणुकीनुसार प्रेमाने, न्यायाने, दयेने वागविणे होय. आपणांस परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद मिळावा तसेच आपल्या देशाच्या राजकीय नेत्यांनी सत्याच्या व नीतीच्या मार्गाने कारभार चालवून, देशाची उत्तरोत्तर प्रगतीची वाटचाल करण्यास त्यांना प्रभूची प्रेरणा मिळावी म्हणून प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे सर्वसमर्थ बापा, तू आपल्या प्रेमनियमानुसार सृष्टीला मार्गदर्शन करतोस आम्हांलासुध्दा त्याचप्रमाणे मार्गदर्शन कर. आम्ही एकमेकांवर प्रेम करावे व शेवटी आम्हासाठी तयार ठेवलेल्या सार्वकालिक जीवनात प्रवेश मिळवावा म्हणून आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्ताच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**मत्तय या पुस्तकातून घेतलेले वाचन ५५:६-९**

**"माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नव्हेत, असे परमेश्वर म्हणतो."**

परमेश्वरप्राप्तीचा काळ आहे तोवर त्याला शोधा. तो जवळ आहे तोच त्याचा धावा करा. दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पनांचा त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याच्यावर दया करील. तो आमच्या देवाकडे वळो, तो त्याला उदंड क्षमा करील." माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नव्हेत, माझे मार्ग तुमचे मार्ग नव्हेत," असे परमेश्वर म्हणतो. आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे तसे माझे मार्ग तुमच्या मार्गाहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनाहून उंच आहेत.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१४५:२-३, ८-९, १७-१८**

प्रतिसाद : **जे परमेश्वराचा धावा करतात त्या सर्वांच्या तो समीप आहे.**

१. मी प्रतिदिवशी तुला धन्यवाद देईन आणि सदासर्वकाळ तुझ्या नामाचे स्तवन करीन. परमेश्वर थोर आणि परमतुल्य आहे, त्याची थोरवी अगम्य आहे.

२. परमेश्वर कृपाळू आणि दयाळू आहे, तो मंदक्रोध आणि अतिदयाळू आहे. परमेश्वर सगळ्यांना चांगला आहे, त्याची दयादृष्टी त्याने निर्मिलेल्या सर्व कृत्यांवर आहे.

३. परमेश्वर आपल्या सर्व मार्गात न्यायी आहे, तो आपल्या सर्व कृत्यांत दयाळू आहे, जे कोणी त्याचा धावा करतात, जे मनापासून त्याचा धावा करतात, त्या सर्वांच्या तो समीप आहे.

### दुसरे वाचन

**पौलाचे फिलिप्पीकरांस पत्र यातून घेतलेले वाचन १:२०-२४. २७**

**"मला जगणे हे ख्रिस्त आहे."**

जगण्याने किंवा मरणाने माझ्या शरीराच्याद्वारे ख्रिस्ताचा महिमा होईल, कारण मला जगणे हे ख्रिस्त आणि मरणे हे लाभ आहे. जर देहात जगणे हे माझ्या कामाचे फळ आहे तर कोणते निवडावे हे मला समजत नाही. मी ह्या दोहोसंबंधाने पेचात आहे, तेथून सुटून जाऊन ख्रिस्ताजवळ असण्याची मला उत्कंठा आहे. कारण देहात राहण्यापेक्षा हे फारच चांगले आहे, तरी मी देहात राहणे हे तुम्हांकरिता अधिक आवश्यक आहे. सांगावयाचे ते इतकेच की, ख्रिस्ताच्या सुवार्तेत शोभेल असे आचरण ठेवा.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**लूक १९:३८**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादित असो, स्वर्गात शांती आणि उर्ध्वलोकी गौरव

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २०:१-१६**

**"मी उदार आहे हे तुझ्या डोळ्यात सलते काय?"**

येशू आपल्या शिष्यांस म्हणाला, "स्वर्गाचे राज्य कोणाएका घरधन्यासारखे आहे. तो आपल्या द्राक्षमळ्यात मोलाने कामकरी लावावयास मोठ्या पहाटेस बाहेर गेला आणि त्याने कामकऱ्यांना रोजचा रुपया ठरवून त्यांना आपल्या द्राक्षमळ्यात पाठवले, मग तो तिसऱ्या तासाच्या सुमारास बाहेर गेला आणि त्याने बाजारपेठेत कित्येकांना रिकामे उभे राहिलेले पाहिले, तो त्यांना म्हणाला, तुम्हीही द्राक्षमळ्यात जा, जे योग्य ते मी तुम्हांला देईन. आणि ते गेले. पुन्हा सहाव्या आणि नवव्या तासाच्या सुमारास तो बाहेर जाऊन तसेच केले. मग अकराव्या तासाच्या सुमारास तो बाहेर गेला तेव्हा कित्येक उभे राहिलेले आढळले. त्यांना त्याने म्हटले, तुम्ही सारा दिवस येथे रिकामे का उभे राहिला आहा? ते त्याला म्हणाले, आम्हास कोणी कामावर घेतले नाही म्हणून? त्याने त्यांस म्हटले, तुम्हीही द्राक्षमळ्यात जा. मग संध्याकाळ झाल्यावर द्राक्षमळ्याचा धनी आपल्या कारभाऱ्याला म्हणाला, कामकऱ्यांना बोलाव आणि शेवटल्यापासून आरंभ करून पहिल्यापर्यंत त्यांना मजुरी दे. तेव्हा जे अकराव्या तासाच्या सुमारास लावले होते ते आल्यावर त्यांना प्रत्येकी रुपया मिळाला. मग जे पहिले आले त्यांना आपल्याला अधिक मिळेल असे वाटले. तरी त्यांनाही प्रत्येकी रुपयाच मिळाला. तो त्यांनी घेतल्यावर घरधन्याविरुध्द कुरकूर करीत म्हटले, "ह्या शेवटल्यांनी एकच तास काम केले, आम्ही दिवसभर उन्हातान्हात कष्ट केले आणि आम्हास आणि त्यास आपण सारखे लेखले." तेव्हा त्याने त्यातील एकाला उत्तर दिले, "गड्या, मी तुझ्यावर अन्याय करत नाही, तू माझ्याबरोबर रुपयाचा ठराव केला की नाही? तू आपला रुपया घेऊन चालायला लाग. जसे तुला तसे ह्या शेवटल्यालाही द्यावे अशी माझी इच्छा आहे. जे माझे आहे त्याचे मला आपल्या मर्जीप्रमाणे करण्याचा हक्क नाही काय? अथवा मी उदार आहे हे तुझ्या डोळ्यांत सलते काय?" ह्याप्रमाणे शेवटले ते पहिले आणि पहिले ते शेवटले होतील.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

### श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे परमेश्वरा, दया कर, आणि आमच्या लोकांची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधूंना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या कुटुंबात, गावामध्ये, समाजामध्ये शांती, प्रेम व ऐक्य सतत नांदत राहावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. आपल्या प्रत्येकाच्या नोकरीधंद्यावर व शेतीवाडीतील कामावर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा व आमचे जीवन बहरावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. आपल्या युवक मित्रमंडळीला वेगवेगळ्या ऐहिक मोहपाशांशी मुकाबला करावा लागत आहे. त्या अग्निदिव्यातून जात असताना युवक-युवतींनी आपल्यामधील विकारांच्या अंधारावर मात करून विवेकबुध्दीच्या प्रकाशात मार्गक्रमण करीत राहावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी आपण प्रार्थना करू या.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या विश्वासाचे व प्रेमाचे प्रतीक म्हणून आम्ही तुला ही दाने अर्पण करीत आहोत. ह्यांचा दयेने स्वीकार कर. ही दाने आम्हासाठी तुझ्या पुत्राचे शरीर व रक्त बनव. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

हे प्रभो, आम्हांला तुझ्या कृपेचे वरदान दे. या समर्पणाद्वारे आम्हाला शक्ती दे. आम्ही साजरा करीत असलेले मुक्तिरहस्य प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

पहिले आणि शेवटले याविषयी जगाचे काही ठोकताळे आहेत. वेळेच्याबाबतीत, कलागुणांच्या बाबतीत, हुशारीच्या बाबतीत, सौंदर्याच्या बाबतीत, धनदौलतीच्याबाबतीत आणि शारीरिक ताकदीच्या बाबतीत जे उत्कृष्ट ते पहिले जे निकृष्ट ते शेवटले असे मानले जाते. आजची वाचने मात्र अशा विचारसरणीला आव्हान देत तीन वेगळे विचार मांडतात:

**(१) देवाच्या कल्पना व मार्ग :** माणूस एका विशिष्ट पातळीवर व पध्दतीने विचार करीत असतो. मात्र परमेश्वराचे मार्ग व त्याच्या कल्पना माणसाच्या मार्गाहून व त्याच्या कल्पनांहून भिन्न असतात. त्यात प्रसंगी जमीन अस्मानाचा फरक असू शकतो असे आजचे पहिले वाचन सांगते. मनुष्य बाह्यस्वरूप पाहतो, परमेश्वर अंतरंग पाहतो. मनुष्य संकुचित दृष्टीने पाहतो, परमेश्वर व्यापक दृष्टीने पाहतो. मनुष्य तात्पुरत्या वेळेपुरता पाहतो. परमेश्वर सार्वकालिक जीवनासाठी पाहतो. त्यामुळे वरवर यशस्वी पडलेला तर अपयशी माणूस अंतर्यामी बलसंपन्न असलेला पाहायला मिळतो.

**(२) आत्मिक वृध्दीसाठी देहात राहणे :** संत पौल तुरुंगात होता. त्याने तेथून फिलिप्पै येथल्या लोकांना पत्र पाठविले. आपले शरीर हा आपल्या आध्यात्मिक विकासातील अडथळा आहे अशी काही काळ त्याची समजूत झालेली होती. हा शरीराचा अडथळा दूर करायचा म्हणजे साक्षात जीवन संपवायचे. मग आपल्या लोकांना मार्गदर्शन कसे करायचे असा प्रश्न त्याला भेडसावत होता. शेवटी तो अशा निष्कर्षापर्यंत येतो की, ''माझ्यासाठी जगणे हे ख्रिस्त व मरणे हा लाभ आहे.'' आपण जगलो काय, मेलो काय आपण ख्रिस्ताचेच आहोत हे महत्त्वाचे आहे.

**(३) पहिले ते शेवटले :** मत्तयच्या समुदायात यहुदी ख्रिस्ती व परराष्ट्रीय ख्रिस्ती उशिरा चित्रात आले म्हणून यहुदी ख्रिस्ती त्यांना तुच्छ लेखीत. दुसरीकडे यहुदी ख्रिस्ती त्यांना तुच्छ लेखीत. दुसरीकडे यहुदी ख्रिस्ती लोकांतही परूशी व जकातदार असे दोन गट होते. जकातदारांना पश्चात्ताप झाल्याने ते उशिरा धार्मिक जीवन जगू लागले अशी परुशी त्यांची हेटाळणी करीत. द्राक्षमळ्यातील कामकऱ्यांचा दाखला देऊन कुरकूर करणारे कसे शेवटचे आहेत व शेवटच्या क्षणीही आज्ञा पाळणारे कसे पहिले आहेत हे येशू दर्शविण्याचा प्रयत्न करतो.

**आत्मपरीक्षण :** पहिले व शेवटले याविषयी माझ्या कल्पना कशा आहेत? मी कोणाला कशाबद्दल कमी लेखतो? इतर मला तुच्छ लेखतात तेव्हा माझा प्रतिसाद काय असतो?

●●●

| सप्टेंबर २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २५ | सं क्लियोफस (हि) | : एज्रा १:१-६/लूक ८:१६-१८ |
| मंगळ २६ | संकोजमास व सं डेमियन (हि) | : एज्रा ६: ७-८,१२, १४-२०/लूक ८:१९-२१ |
| बुध २७ | सं विन्सेंट दि पॉल (पां) | : एज्रा ९:५-९/लूक ९:१-६ |
| गुरू २८ | सं वेन्सेस्लॉस (हि) | : हाग्गायाच्या १:१-८/लूक ९:७-९ |
| शुक्र २९ | सं मायकल, गेब्रियल व राफाएल (पां) | : दानीएल ७:९-१०,१३-१४/योहान १:४७-५१ |
| शनि ३० | सं जेरोम (पां) | : जखऱ्या २:१,५-११/लूक ९:४३-४५ |


**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता (योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)